दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • रविवार दि.१९ एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएचएमआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २३० • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Sunday 19 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 230 • Pages 4 • Rate 4 Rs




# अखंड वीजपुरवठ्यासाठी राज्यात होणार 'एआय'चा वापर

## मान्सूनपूर्व कामे युद्धपातळीवर सुरू

**मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, मान्सूनपूर्व देखभाल-दुरुस्तीची कामे सध्या युद्धपातळीवर सुरू असून, कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी यंत्रणा पूर्णपणे सज्ज आहे. मात्र, ही सर्व कामे अधिक कार्यक्षमतेने करण्यासाठी आधुनिक सॉफ्टवेअर्सचा वापर अनिवार्य आहे. पावसाळ्यात झाडे पडणे किंवा तांत्रिक बिघाडामुळे होणारा खंड टाळण्यासाठी 'एआय'च्या माध्यमातून रिअल-टाइम मॉनिटरिंग करण्यावर भर दिला जाणार आहे. ग्राहकांना अखंडित वीज मिळावी यासाठी खासगी आणि सरकारी अशा सर्व वीज कंपन्यांनी समन्वयाने काम करावे, असे आदेशही यावेळी देण्यात आले.**

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर विजेची विक्रमी मागणी पूर्ण करतानाच, वीजनिर्मिती आणि पुरवठ्यात कोणताही व्यत्यय येऊ नये यासाठी आता 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'चा (एआय) आधार घेतला जाणार आहे. ऊर्जेचे नेटके व्यवस्थापन आणि तांत्रिक बिघाडांचा अंदाज घेण्यासाठी 'एआय'चा प्रभावी वापर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असून, यामुळे राज्याच्या ऊर्जा क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा नवा अध्याय सुरू होणार आहे.सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे शनिवारी आयोजित उन्हाळ्यातील 'पीक डिमांड' आणि वीज वितरण व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. उन्हाळ्याचा वाढता तडाखा आणि आगामी पावसाळा या दोन्ही ऋतूंमध्ये वीजपुरवठा विस्कळीत होण्याची शक्यता असते. ही अडचण दूर करण्यासाठी केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता, ऊर्जा विभागाने तंत्रज्ञानाची जोड द्यावी, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली. विशेषतः मागणीचा अचूक अंदाज वर्तवणे, देखभाल-दुरुस्तीची कामे नियोजित करणे आणि संभाव्य तांत्रिक धोके ओळखण्यासाठी 'एआय' यंत्रणा महत्त्वपूर्ण ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



या बैठकीला ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह टाटा पॉवर, अदानी पॉवर आणि 'बेस्ट'चे प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यात सध्या रुफटॉप सौर ऊर्जेचा वापर वाढत असल्याने त्याचा मोठा फायदा वीज व्यवस्थापनात होत असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. तसेच, वीजनिर्मितीसाठी आवश्यक असलेला कोळसा आणि पाणी यांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याने राज्यावर विजेचे संकट ओढवणार नाही, अशी ग्वाही प्रशासनाकडून देण्यात आली.

## चोरीस गेलेले ट्रॅक्टर सापडले; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी, आरोपी जेरबंद



दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कानडी माळी येथे घरासमोरून चोरीस गेलेले ट्रॅक्टर व ट्रॉली अवघ्या दोन दिवसांत शोधून काढण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सुमारे ५ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, फिर्यादी सतिष सुदाम बनसोडे (रा. कानडी माळी, ता. केज) यांनी दि. १५ एप्रिल २०२६ रोजी त्यांचे ट्रॅक्टर व ट्रॉली घरासमोरून चोरीला गेल्याची तक्रार केज पोलीस ठाण्यात दिली होती.

या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने हाती घेतला. सुमारे ४० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज व तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला.दि. १७ एप्रिल रोजी रात्री पायतळवाडी (ता. माजलगाव) येथून सापळा रचून आरोपी रामदास आसाराम श्रीराम (वय २५, रा. पायतळवाडी, ता. माजलगाव) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरी केलेले ट्रॅक्टर व ट्रॉली जप्त करण्यात आले.

ही संपूर्ण कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, पोलीस निरीक्षक शिवाजी बांटे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.तसेच या मोहिमेत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोउपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, बप्पासाहेब घोडके,दिलीप गिते,विकी सुरवसे,गणेश मरडे,विकास राठोड यांनी सहभाग घेतला.या कामगिरीमुळे केज तालुक्यातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## तांदळवाडी घाट पानंद रस्ते कामात नरेगा घोटाळा नितीन सोनवणे यांची भ्रष्ट अधिकाऱ्यांना कायदेशीर नोटीस

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत तांदळवाडी घाट (ता. बीड) येथील रस्त्याच्या कामात मोठ्या अनियमिततेचा प्रकार समोर आला आहे. काम अर्धवट असताना पूर्ण झाल्याचे खोटे अहवाल, बनावट जिओ टॅग फोटो आणि मजुरांचे खोटे जबाब तयार करून शासनाची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांनी केला आहे.सोनवणे यांनी याबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती बीड यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे. नोटीसीत म्हटले आहे की, तांदळवाडी घाट येथील आठ रस्त्याचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. तरीही चौकशी समितीने खोटा अहवाल सादर केला असून, बनावट जिओ टॅग फोटो आणि मजुरांचे खोटे जबाब जोडून शासनाची दिशाभूल करण्यात आली आहे. गटविकास अधिकारी यांनी कोणतीही शहानिशा न करता कामाची रक्कम एमआरजीएस खात्यात जमा केली आहे.चौकशी समितीतील गोंधळ गटविकास अधिकारी यांनी नेमलेल्या चौकशी समितीमध्ये सहाय्यक गटविकास अधिकारी यांचे नाव अहवालात नसताना इतर अधिकाऱ्यांनी (वाघ बी.जी., शाखा अभियंता, पोकळे, शिंदे आर.जी., जामकर एस.एस., आमटे ए.बी. इत्यादी) खोटा अहवाल तयार केल्याचा आरोप आहे. काम न करता पैसे उचलण्याची तयारी सुरू असल्याचे सोनवणे यांनी स्पष्ट केले.उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्याची तयारी

नितीन सोनवणे यांनी नोटीसीत स्पष्ट केले की, सदर कामाचे देयके कोणालाही देण्यात येऊ नयेत. अन्यथा छत्रपती संभाजीनगर येथील उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल करण्यात येईल. तसेच या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या प्रकरणाने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. स्थानिक ग्रामस्थ आणि पँथर सेना कार्यकर्ते याप्रकरणी सतत पाठपुरावा करत आहेत. भ्रष्ट अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी नितीन सोनवणे यांनी केली आहे.

## लग्नाचे आमिष दाखवून आठ महिन्यापासून अल्पवयीन मुलीवर अत्याचार;केज पोलिस ठाण्यात पोक्सो कायदा अंतर्गत गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज पासून जवळच असलेल्या एका खेडेगावात दोन वर्षां पासून सालगडी म्हणुन काम करणाऱ्या इसमाच्या इयत्ता ८ वी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यावर तब्बल आठ महिन्यापासून अत्याचार करणाऱ्या एका नराधमा विरुद्ध पीडितेच्या फिर्यादीवरून केज पोलिसात पोक्सो अंतर्गत गून्हा नोंद झाला आहे.याबाबत सविस्तर माहिती अशी की, विदर्भातील एका खेड्यातील सालगाडी हा केज पासून जवळच असलेल्या एका खेड्यातील शेतकऱ्यांच्या शेतात सालगडी म्हणुन काम करीत आहे.त्याच्या भागातीलच दुसरा सालगडी केज येथील एका शेतकऱ्याकडे सालगडी म्हणुन काम करीत असून,दोघे एकाच भागातील असल्यामुळे एकमेकांकडे त्यांचे येणे जाणे व्हायचे यातूनच इयत्ता आठवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या १४ वर्षे वयाच्या अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष





दाखवून दि.१ सप्टेंबर २०२५ च्या मध्यरात्री पासून ते दि.१४एप्रिल २०२६ च्या दुपारी १२ वाजेपर्यंत सातत्याने अत्याचार केला.ही माहिती कोणाला सांगितलीस तर तुझ्या वडीलाला जीवे मारण्याची धमकी दिली होती.याप्रकरणी दि.१४ एप्रिल रोजी मंगळवारी दुपारी पीडितेच्या फिर्यादीवरून भालशंकर रा.बुलढाणा जिल्हा ह.मु. केज याच्या विरुद्ध पोक्सोचा गून्हा केज पोलिसात नोंद झाचा असून,पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पिंक पथकाचे प्रमुख पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.









# संपादकीय

## पुन्हा बारगळले!

महिला आरक्षण आणि जात आरक्षण या दोन्हींचंही प्रतिबिंब २०३४ च्या निवडणुकीत दिसेल. महिलांच्या आरक्षणाला तोपर्यंत तिष्ठत ठेवण्याऐवजी मतदारसंघांत सरसकट ५० टक्के वाढ करून महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यावं आणि मतदारसंघही थोड्या तरी कमी लोकसंख्येचे करावेत, असा सरकारचा प्रयत्न होता. तो आता मागे पडला आहे.वरिष्ठ कायदेमंडळात महिलांचे ३३ टक्के प्रतिनिधित्व राखीव ठेवण्यासाठी मांडलेल्या विधेयकाला काल लोकसभेत बहुमत मिळालं, पण घटनादुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यात कमी पडल्याने ते पुन्हा एकदा बारगळलं. महिलांना राज्याच्या आणि देशाच्या कायदेमंडळात ३३ टक्के आरक्षण देऊ करणारं पहिलं विधेयक गेल्या शतकात एच. डी. देवेगौडा पंतप्रधान असताना मांडलं गेलं. त्यानंतरही तसे प्रयत्न झाले. पण, त्यात नेहमीच काही ना काही तांत्रिक कारणं काढून खोडा घातला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०२३ मध्ये मांडलेल्या 'नारीशक्ती वंदन अधिनियम २०२३' या विधेयकाला मात्र एकमताने मंजुरी मिळाली होती. त्या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी यावेळी ही एकत्रित विधेयकं मांडली जाणार होती. त्यासाठी सरकारने हे विशेष अधिवेशन बोलावलं होतं. सरकारने महिला आरक्षण संविधान दुरुस्ती विधेयक आणि मतदार संघ फेररचना, तसंच केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) ही दोन साधी विधेयकं परस्परांशी सांगड घालून मांडल्याने विरोधकांचा सरकारच्या या पावलाला विरोध होता. महिलांच्या आरक्षणासंदर्भातील विधेयकाला आमचा विरोध नाही; पण त्याआडून सरकार अन्य दोन विधेयकं मांडत आहे. ती मंजूर झाली, तर देशात उत्तर आणि दक्षिण अशी दुफळी तयार होईल. प्रगत राज्यांचा त्यात तोटा होईल. विकसित, अर्ध विकसित किंवा विकासोन्मुख राज्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येत वाढ झाली, तर त्यांचं राज्य विकसित, प्रगत राज्यांवर अधिक घट्ट होईल, अशी भीती विरोधकांकडून मांडली जात होती. महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय धोरणांसोबत राहात असल्याने मोदी सरकारच्या या विधेयकांना महाराष्ट्रातून पक्षीय धोरणातून विरोध झाला; पण राज्य म्हणून कुठेही विरोधाचा सूर उमटला नाही. दक्षिणेत मात्र पक्षांच्या सीमा ओलांडून राज्य म्हणून आक्षेप नोंदवले गेले. जनगणनेच्या आधारावर होणाऱ्या मतदार संघांच्या परिसीमनात आपल्यावर अन्याय होऊ नये, भविष्यात आपला राजकीय तोटा होऊ नये, यासाठी दक्षिणेतल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीत असलेल्या मुख्यमंत्र्यांनीही गेलं वर्षभर कुरकुर चालवली होती. चंद्राबाबू नायडू यांनी तर अधिक अपत्य असल्यास विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. दक्षिणेतील पक्ष आणि नेत्यांचा लोकसंख्येवर आधारित परिसीमनाला, जातगणना न झालेल्या २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याला विरोध होता; तर उत्तरेकडील पक्ष, नेत्यांनी २०२६ च्या जातगणनेनंतर महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक आणल्यास मागास, अतिमागास, आदिवासी महिलांना अधिक न्याय मिळेल, असा मुद्दा पुढे केला होता. समाजवादी पार्टीने नेहमीप्रमाणे अल्पसंख्याक; म्हणजे मुस्लीम महिलांचा आरक्षण विधेयकात स्वतंत्र विचार व्हावा, अशी भूमिका मांडली होती. पण, त्याला काही अर्थ नव्हता. कारण, धर्माच्या आधारे आरक्षणाची तरतूद घटनेत नाही, हे त्यांनाही माहीत आहे. आपला मतदार डोळ्यांपुढे ठेऊन केलेली ही मागणी निरर्थक होतीच; पण त्याहीपेक्षा समाजमनात नको ते विष कालवणारी, निषेधार्ह होती. महिला आरक्षणासाठी घटनेत १३१ वी दुरुस्ती सुचवणारं विधेयक दोन तृतीयांश संख्याबळाअभावी पराभूत झाल्यानंतर सरकारने मतदारसंघ फेररचना आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयकं मागे घेतली. ती मताला टाकलीच नाहीत. साध्या बहुमताने ती सहज मंजूर झाली असती; पण ती स्वतंत्रपणे मंजूर होण्याला काही अर्थ नव्हता. त्यातून आणखी वादाचे मुद्दे पुढे आले असते. महिलांना ३३ टक्के आरक्षण दिल्यास पुरुष लोकप्रतिनिधींच्या तेवढ्या जागा कमी झाल्या असत्या. या प्रक्रियेत आपल्या जागा जातील, अशी भीती बऱ्याच दिग्गजांना, पुरुषी मानसिकतेच्या राजकीय वर्तुळाला आहे, हे ओळखून त्यांची भीती घालवण्यासाठी सध्याच्या लोकसभेच्या ५४३ जागांत ५० टक्के भर घालून महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्याची शक्कल सरकारने लढवली होती. पण, विरोधकांचा त्यालाही विरोध होता. वास्तविक मुद्द्यांवर विरोध करता येत नाही हे स्पष्ट असल्याने विरोधकांनी सरकारच्या हेतूवर शंका घेऊन नेहमीप्रमाणे काल्पनिक विरोध सुरू केला होता. सरकारच्यावतीने प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात जागांमध्ये कशी वाढ होईल, याचा तपशील आकडेवारीसह दिला गेला होता. पण या ५० टक्के वाढीचा उल्लेख विधेयकाच्या प्रस्तावात स्पष्टपणे नाही, म्हणजे यामागे सरकारची काहीतरी चाल आहे, असा संशय व्यक्त करून विरोधकांनी आपला विरोध कायम ठेवला. लोकसभेतील चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसचे नेते वेणुगोपाल यांना 'मी आत्ताच्या आत्ता सरसकट ५० टक्क्यांचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करतो. तुम्ही सर्व विधेयकं मंजूर करण्याची हमी द्या', असं आव्हान दिलं, तेव्हा विरोधी बाकांवर भीषण शांतता पसरली होती. काळंबेरं सरकारच्या नाही, विरोधकांच्याच मनात आहे, हे त्यावेळी स्पष्ट झालं!२०११ नंतर देशाच्या लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणावर झालं आहे. त्यामुळे, मतदारसंघांचा तोल पूर्णपणे ढळला आहे. मतदारसंघांतील लोकसंख्येत फार मोठी तफावत असू नये, असं घटनेत नमूद आहे. तरीही १९७१ च्या जनगणनेच्या आधारावरील मतदारसंघांतच आज निवडणुका होत आहेत. महिला आरक्षणाच्या निमित्ताने त्यातही तात्पुरती दुरुस्ती होईल, २०१९ च्या निवडणुका त्या आधारे घेता येतील; त्यानंतरच्या निवडणुका आता सुरू झालेल्या जनगणनेच्या आधारावर घेता येतील. या जनगणनेत जातगणनाही होणार असल्याने २०३४ च्या निवडणुकात या जातगणनेवर आधारित राखीव मतदारसंघ ठरतील. महिला आरक्षण आणि जात आरक्षण या दोन्हींचंही प्रतिबिंब २०३४ च्या निवडणुकीत दिसेल. महिलांच्या आरक्षणाला तोपर्यंत तिष्ठत ठेवण्याऐवजी मतदारसंघांत सरसकट ५० टक्के वाढ करून महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यावं आणि मतदारसंघही थोड्या तरी कमी लोकसंख्येचे करावेत, असा सरकारचा प्रयत्न होता. तो आता मागे पडला आहे. ही विधेयकं आणण्यामागे राजकारण होतं, असा आरोप विरोधी पक्ष करत आहेत. राजकीय व्यवस्थेत राजकारणच करायचं असतं, हे विरोधी पक्षांना कळत नाही आणि जमतही नाही हीच आजची देशासमोरची खरी अडचण आहे.

# सत्तेत असताना महिला आरक्षण विधेयक फाडले शिवसेना खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांचा काँग्रेसवर निशाणा

## मतदार संघ पुनर्रचनेवरुन विरोधकांचा उत्तर–दक्षिण भेदभाव करण्याचा डाव

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

तब्बल ३० वर्ष रखडलेल्या महिला आरक्षणाला काँग्रेसनेच विरोध केला होता. आरक्षणाला विरोध करताना काँग्रेस नेत्यांनी विधेयक फाडले होते, असा निशाणा शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काँग्रेसवर साधला. महिलांना आरक्षण मिळायला पाहिजे होते, मात्र आरक्षणाच्या मुद्द्यावर अनेक वर्ष काँग्रेसची राजकारण करण्यात गेली, अशी खरमरीत टीका खासदार डॉ. शिंदे यांनी केली. नवी दिल्ली येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार नरेश म्हस्के आणि महाराष्ट्रातून आलेल्या महिला आघाडीतील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की, काँग्रेसमुळे ३० वर्ष रखडलेल्या महिला आरक्षणाला सत्यात उतरवण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी केले. हा कायदा वर्ष २०२३ मध्ये हा कायदा सभागृहात सर्वानुमते पारित झाला होता. विधेयक जेव्हा पास होते तेव्हा ते फक्त लागू करायचेच असते. सरकारने काल अध्यादेश काढून लागू केलं, त्यात गैर काय, असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. महिलांना आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सरकारने अध्यादेश काढून दाखवून दिले, असे ते म्हणाले. खासदार डॉ. शिंदे म्हणाले की संसेदत सादर झालेल्या महिला आरक्षण विधेयकाला शिवसेनेने पाठिंबा दिलेला आहे. या विधेयकाला पाठिंबा दर्शवण्यासाठी शिवसेनेच्या सर्व खासदारांनी त्यांच्या मतदार संघातून १० महिलांना दिल्लीत आणले.



महाराष्ट्रातून आलेल्या या महिलांनी सभागृहात उपस्थित राहून पाठिंबा दर्शवला, असे ते म्हणाले. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण लागू झाल्यानंतर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढेल, त्यांना समान संधी निर्माण होतील, असे ते म्हणाले. महिला आरक्षण विधेयक मंजूर करण्याचा सरकारचा हेतू शुद्ध आहे. लाडक्या बहिणी पुढे कशा येतील, यासाठी आम्ही काम करतोय. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना पहिल्यांदाच महाराष्ट्रात लाडकी बहिण सारखी मोठी योजना लागू केली. लाडक्या बहिणींनी शिंदे साहेबांवर आणि सरकारवर भरभरुन प्रेम केलं, असे ते म्हणाले. मतदार संघ पुनर्रचनेवर विरोधकांकडून उत्तर भारत आणि दक्षिण भारत असा भेदभाव करण्याचा प्रयत्न केला जात आहे, अशी टीका खासदार डॉ. शिंदे यांनी केली. मतदार संघ पुनर्रचनेचा फॉर्म्युला काय असेल, हे गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात सांगितले. पुनर्रचनेनंतर कुठल्याही जागा कमी होणार नाहीत, मात्र यावर विरोधक दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे ते म्हणाले.


### शिवसेना नेतृत्वाने यापूर्वीच पक्षांतर्गत महिलांना ५० टक्के आरक्षण दिले

खासदार डॉ. शिंदे म्हणाले की शिवसेना पक्षाने यापूर्वीच विधान परिषदेत आणि राज्यसभेत महिलांना ५० टक्के आरक्षण देण्याचे काम केले. शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यसभेसाठी डॉ. ज्योती वाघमारे यांना संधी दिली. विधान परिषदेत डॉ. निलम गोऱ्हे, डॉ. मनीषा कायंदे, भावना गवळी या शिवसेनेच्या आमदार आहेत. आगामी विधान परिषद निवडणुकीसाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे अंतिम निर्णय घेतील, असे ते म्हणाले.

# नगरविकास विभागाने महिला सुरक्षेसाठी स्वतंत्र कार्यप्रणाली विकसित करावी–उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या चौथ्या महिला धोरणांतर्गत महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना व महिला योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नगरविकास विभागाला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या आधारे समानतेचा विचार पुढे नेत महिलांच्या विशेष गरजा ओळखून स्वतंत्र व परिणामकारक कार्यप्रणाली विकसित करावी, असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.दि. १६ एप्रिल २०२६ रोजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन महिला सुरक्षेसंदर्भात पुढील मार्गदर्शन व सहकार्याबाबत निवेदन सादर केले होते. त्या अनुषंगाने महिला सक्षमीकरण व सुरक्षेबाबत नगरविकास विभागाकडून करावयाच्या उपाययोजना व कार्यवाहीच्या संदर्भात डॉ. गोऱ्हे यांचा अध्यक्षतेखाली आज विधान भवनात बैठक



पार पडली. बैठकीस नगरविकास विभागाचे उपसचिव अजिंक्य बगाडे तसेच अक्षरा सेंटर, मुंबईच्या सहसंचालक श्रीमती नंदिनी शाह यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी सुविधा उपलब्ध करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे. उद्याने, क्रीडांगणे, मॉल्स व बाजारपेठांमध्ये महिलांच्या गरजा लक्षात घेऊन सुविधा विकसित कराव्यात. तसेच स्वच्छ व मानक कार्यपद्धती असलेली पाळणाघरे व शिशुगृहे उपलब्ध करून देण्यात यावीत. सार्वजनिक उद्यानांमध्ये ठराविक वेळ महिलांसाठी व त्यांच्या सोबत येणाऱ्या लहान मुलांसाठी राखीव ठेवण्याबाबतही विचार करावा.तसेच राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये निर्जन व अंधाऱ्या ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. बाजारपेठा, घाट व बसथांबे परिसरात स्वच्छतागृहांची सोय करण्यात यावी. महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी निर्देश दिले.महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये महिला मदत केंद्र स्थापन करावीत, अशी सूचनाही त्यांनी केली. महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी जेंडर रिसोर्स सेंटर उभारणे, तक्रार निवारण प्रणाली अधिक सक्षम करणे, तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.याशिवाय, राज्यातील सर्व महापालिकांच्या परिवहन सेवांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात याव्यात. बसस्थानकांवरील सुविधा, सुरक्षितता तसेच मोठ्या बस डेपोमधील अडचणींकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी नगरविकास विभागाने सर्व महापालिकांच्या परिवहन विभागांसोबत समन्वय साधून बैठक आयोजित करावी, असेही त्यांनी सांगितले.

# बौद्ध समाजाचा विकास रोखण्याचा भाजपाचा डाव–उत्तमराव गायकवाड यांचा गंभीर आरोप

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे वरिष्ठ नेते तथा समाजभूषण उत्तमराव गायकवाड यांनी भाजपाविरोधात तीव्र आरोप करताना, राज्यातील बौद्ध समाजाच्या सर्वांगीण विकासाला रोखण्यासाठी केंद्र व राज्यातील भाजपा प्रणित सरकारांकडून योजनाबद्ध प्रयत्न सुरू असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्रात या बाबतीत सर्वाधिक प्रमाणात हालचाली होत असून, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर त्यांनी थेट निशाणा साधला.गायकवाड म्हणाले की, बौद्ध समाज शिक्षण, नोकरी व आर्थिक क्षेत्रात प्रगती करत असताना, काही शक्तींना ही प्रगती अस्वस्थ करणारी ठरत आहे. त्यामुळे विविध पातळ्यांवर अडथळे निर्माण करून समाजाला मागे खेचण्याचे षडयंत्र रचले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावर बोलताना, त्यांनी सांगितले की, बौद्ध समाजाला मिळणाऱ्या आरक्षणावर गदा आणण्यासाठीच हा प्रयत्न होत आहे.



या संदर्भात नेमण्यात आलेल्या समित्यांची माहिती पारदर्शकपणे जाहीर करण्यात आलेली नाही. अहवाल कधी तयार झाला, कोणत्या समितीने तो बनवला, तो सर्वोच्च न्यायालयात सादर केला का, याबाबत सरकार मौन बाळगत असल्याचे त्यांनी नमूद केले.तसेच, मागासवर्गीय समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केला जात असून, विशिष्ट समाजांना झुकते माप देऊन एकूण आरक्षण व्यवस्थेवर परिणाम करण्याचा डाव असल्याचा आरोपही त्यांनी केला.शैक्षणिक क्षेत्रात बौद्ध विद्यार्थ्यांची प्रगती रोखण्यासाठी बार्टीसारख्या संस्थांमध्ये अडचणी निर्माण केल्या जात असल्याचेही गायकवाड यांनी सांगितले. संशोधन फेलोशिपधारकांना वेळेवर निधी मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.याशिवाय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने प्रकाशन समितीमध्ये नव्याने करण्यात आलेल्या नियुक्त्यांवरही त्यांनी आक्षेप घेतला. या माध्यमातून आंबेडकरांच्या विचारांमध्ये हस्तक्षेप होण्याची भीती व्यक्त करत त्यांनी या निर्णयाचा निषेध केला.दिक्षाभूमी, चैत्यभूमी आणि इंदू मिल येथील आंतरराष्ट्रीय स्मारक प्रकल्पांच्या कामांमध्ये होत असलेल्या विलंबावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. वाढता खर्च आणि कामातील दिरंगाईबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.शेवटी, बौद्ध समाजाने एकजूट ठेवून अशा कथित डावांना ओळखून त्याविरोधात आवाज उठवण्याचे आवाहन उत्तमराव गायकवाड यांनी केले.

# मरेगाव आश्रम शाळेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी




**दैनिक वादळ वार्ता**
**मुल । प्रतिनिधी**

शासकीय माध्यमिक आश्रम शाळा, मरेगाव येथे १४ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक बिसेन सर होते, तर प्रमुख अतिथी म्हणून अधीक्षक रंगारी सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश जयारपवार सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन शीतल शीडाम यांनी मानले. यावेळी मेश्राम , परिचारिका तोटावर तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग घेत आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक बिसेन यांनी विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे महत्त्व सांगत मोलाचे मार्गदर्शन केले. त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांना शिक्षण, समानता आणि प्रगतीचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

# विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना बळ देत आ.डावखरे यांचा वाढदिवस साजरा

## भाजपचे कृष्णा भुजबळ यांसकडून विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांसोबतचा प्रत्येक क्षण हा अविस्मरणीय असतो आणि समाजाला काहीतरी परत देण्याची हीच खरी संधी असते. अशा भावना व्यक्त करत आमदार ड. निरंजन डावखरे यांनी कर्णबधीर विशेष विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हातभार लावणाऱ्या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. शिक्षक हे कोणतीही अपेक्षा न ठेवता कर्मयोगी वृत्तीने कार्य करत असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आयुष्यात यशस्वी झाल्यानंतर आपल्या शाळा आणि शिक्षकांकडे नक्कीच वळून पाहावे, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले.

कोकण पदवीधर मतदार संघाचे आमदार ड. निरंजन डावखरे यांच्या वाढदिवसानिमित्त ठाणे पूर्व कोपरी येथे विशेष विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य मोफत वाटपाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. भारतीय जनता पार्टी, कोपरी मंडळाचे अध्यक्ष कृष्णा भुजबळ यांच्या पुढाकारातून आयोजित या कार्यक्रमाने वाढदिवस साजरा करण्याची एक वेगळीच आदर्श परंपरा जपली.



भारतीय स्त्री जीवन विकास परिषद संचालित कमलिनी कर्णबधिर विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून त्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावला. ठाणे पूर्व येथील सभागृहात शुक्रवारी (ता. १७ एप्रिल) हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना आमदार निरंजन डावखरे यांनी, समाजाने आपल्याला दिलेले देणे आपण समाजाला परत दिले पाहिजे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी नवी दिशा मिळते. या संस्थेचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी हे विद्यार्थ्यांसाठी पालकांपेक्षाही अधिक मेहनत घेतात, असे नमूद करत त्यांनी त्यांच्या कमलिनी शाळेच्या कार्याचे कौतुक केले. या विद्यार्थ्यांपैकी भविष्यात अनेकजण मोठं यश संपादन करतील. मात्र, आयुष्यात पुढे गेल्यानंतर एकदा तरी आपल्या शाळेकडे आणि शिक्षकांकडे वळून पाहा. त्यांनी दिलेल्या संस्कारांची जाणीव ठेवा, असे भावनिक आवाहनही त्यांनी केले. तसेच वाढदिवस केवळ औपचारिक साजरे न करता विद्यार्थ्यांना मदत करण्याची परंपरा जोपासणाऱ्या कृष्णा भुजबळ यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक आ. डावखरे यांनी केले.

या प्रसंगी ठाण्याचे उपमहापौर कृष्णा पाटील, नगरसेवक भरत चव्हाण, भाजप ठाणे शहर उपाध्यक्ष राजेश गाडे, अमरीश ठाणेकर, विनोद टिकमाणी, सिद्धेश पिंगुळकर, सचिन कुटे, रोहित कवे, शेखर निकम, मनोज तिवारी, कमलाकर कुरतडकर, प्रफुल्ल नाखवा, नितीन पाटील आदीसह भाजप कोपरी मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच भारतीय स्त्री जीवन परिषदेच्या पद्मजाताई काळे, मानसीताई सहस्त्रबुद्धे आणि कमलिनी विद्यालयाचे शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कृष्णा भुजबळ दरवर्षी राबवित असलेल्या या सेवाभावी उपक्रमाचे कौतुक केले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी नवी दिशा मिळते, अशा भावना व्यक्त केल्या. शाळा व्यवस्थापन आणि संस्थेच्या मान्यवरांनी शाळेप्रती असाच स्नेह कायम ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# शेवडी (बा) मंडळात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत शेवडी मंडळात महसूल समाधान शिबिर उत्साहात; आ.आनंदराव बोंढारकर यांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

शेवडी ता. लोहा, जि. नांदेड येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर अभियानांतर्गत शेवडी बा येथे दिनांक १७ एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेले समाधान शिबिर मोठ्या उत्साहात आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडले.या शिबिरात शेवडी मंडळातील विविध गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या विविध योजनांची माहिती घेतली तसेच अनेक योजनांचा प्रत्यक्ष लाभही घेतला. नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तात्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव बोंढारकर होते. यावेळी लोहाचे तहसीलदार विठ्ठल परळीकर, नायब तहसीलदार पाठक साहेब, खैरे साहेब, गटविकास अधिकारी महेंद्र कुलकर्णी, उपअभियंता शिवाजी राठोड (बांधकाम विभाग), उपअभियंता बनसोडे (पाणीपुरवठा विभाग), महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी एस. पी. माने, तालुका आरोग्य अधिकारी कांबळे, जलसंधारण विभागाचे उत्तम गायकवाड, महावितरणचे गव्हाणे साहेब आदी मान्यवर उपस्थित होते.

तसेच माजी सरपंच कैलासराव धोंडे, सरपंच बसवेश्वर धोंडे, विस्तार अधिकारी म्हेत्रे साहेब, मंडळ अधिकारी रेनके साहेब, तलाठी भांगे साहेब, ग्रामपंचायत अधिकारी हरीहर विश्वासराव साहेब, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी- निळकंठ पांडागळे साहेब,महसूल विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी, तहसील कार्यालयातील अधिकारी तसेच इतर विविध शासकीय विभागांचे कर्मचारी, शेवडी मंडळातील सर्व सरपंच, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवांचा लाभ मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. शासनाच्या योजना गावपातळीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या दृष्टीने अशा शिबिरांचे मोठे महत्त्व असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



## सर्वधर्मीय राज्यस्तरीय १८ व्या अधिकमास अखंड शिवनाम सप्ताह ग्रंथराज परमरहस्य परायण सोहळ्याला हजारोच्या संख्येने सहभागी व्हा–शि भ प कावडे गुरुजी हसनाळीकर

दैनिक वादळ वार्ता

**हनुमंत चंदनकर | नायगांव**

नांदेडच्या धर्माबाद तालुक्यातील श्रीक्षेत्र महादेव मंदिर विळेगांव थडी येथे वसुंधरारत्न राष्ट्रसंत शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या आशीर्वादाने व राजशेखर शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या सानिध्यात दिनांक २१ मे ते २८ मे दरम्यान राज्यस्तरीय अठरावा अधिक मास अखंड शिवनाम सप्ताह ग्रंथराज परमर्ष पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे तरी या सोहळ्याला पाच हजार पेक्षा अधिक पारायण करण्यासाठी भाविकांनी आपली उपस्थिती नोंदवावी व तन–मन–धनाने सहकार्य करावे असे आव्हान महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार शिवभक्त परायण मोहन कावडे गुरुजी हसनाळीकर यांनी केले आहे.



## श्रीसंत भगवानबाबा व संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी बीड येथे दि २० एप्रील रोजी मंझरीकर महाराज यांचे किर्तन

दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

बीड येथील श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगररोड बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवानबाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी वर्ष १४वे संत वामनभाऊ, संतभगवानबाबा, संत तुकाराम, विठ्ठल–रूक्मिणि, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दि १९/४/२०२६ते२१/४/२०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे या सप्ताहाचेद्वितीय दिनी. दि२० एप्रील सोमवार रोजी रात्री ८वा ह भ प ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर (माऊली) यांचे हरिकिर्तन होईल तरी बीड शहरातील परीसरातील भाविक भक्तांनी किर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्रीसंत भगवानबाबा व श्रीसंत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी चे अध्यक्ष डॉ राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी परिसरातील भाविक भक्त यांनी केले.



## कला शिक्षक श्री ई टी पांचाळ सर यांचा मुस्तापूर येथील ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**हनुमंत | चंदनकर नायगांव**

बिलोली तालुक्यातील पिंपळगाव (कु) येथील संत कबीर विद्यालयाचे कर्तव्यदक्ष व संयमी कलाआधापक श्री ई टी पांचाळ सर यांना नुकताच उत्कृष्ट राज्यस्तरीय कला अध्यापक गौरव पुरस्कार २०२६ मिळाला आहे त्यांचे अभिनंदन करण्यासाठी आज दिनांक १६ एप्रिल रोजी मुस्तापूर येथे चालत असलेल्या सर्वधर्मीय अखंड शिवनाम सप्ताह सोहळा प्रसंगी गावकऱ्यांच्या वतीने व महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार प्रवचनकार शि भ प मोहनराव कावडे गुरुजी हसनाळीकर यांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आला यावेळी सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री सुभाष मारोतराव धुमाळे सर गायक सिंगनवाड,बाबू महाराज बेटकबिलोली,कालीदास महाराज किडे,बरगे महाराज आरळीकर, योगेश महाराज बेळीकर, विठ्ठल धुमाळे नागूमामा पत्रकार हनुमंत चंदनकर यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सातपुड्यात चारोळी हंगामाला सुरुवात आदिवासींच्या हाताला मिळतोय रोजगार


### रानमेव्याच्या वेचणीमुळे होते लाखो रुपयांची उलाढाल; मात्र यंदा उत्पादन घटण्याची शक्यता

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी | मोलगी**

सातपुड्यात चारोळी वेचणीचा हंगाम सुरु झाला असुन झाडांवरुन पडलेली चारोळीची फळे गोळा करुन त्यातून बिया काढण्याचे काम सध्या वेगाने सुरु आहे. या हंगामामुळे आदिवासी कुटुंबांना रोजगार मिळत असुन बाजारात चारोळीच्या बिया ११०० ते १२०० रुपये प्रतिकिलोपर्यंत दराने खरेदी होत आहे. मात्र, यंदा चारोळीचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने शेकडो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न निर्माण होणार आहे.चारोळी हा ग्रामीण आणि सातपुड्याच्या आदिवासी भागातील उत्पन्नाचा महत्त्वाचा स्रोत आहे. प्रथिनांनी समृद्ध असलेली चारोळीची पौष्टिक बी गोड पदार्थ, खीर, बासुंदी यांसारख्या खाद्य पदार्थांमध्ये मोठ्या प्रमाणात वापरली जाते. नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित या हंगामामुळे शेकडो कुटुंबांचा घरखर्च भागविण्यास मदत होत असल्यामुळे उन्हाळ्यातील बेरोजगारी देखील काही प्रमाणात कमी होते.

चारोळी वेचणीची प्रक्रिया मोठी श्रमप्रधान असुन, प्रथम झाडांवरुन पडलेली फळे गोळा केली जातात. ते सुकवून नंतर त्यांचे कठीण कवच फोडून आतल्या बिया वेगळ्या केल्या जातात आणि व्यापाऱ्यांना विक्रीसाठी दिल्या जातात. या प्रक्रियेमुळे स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती होते.मात्र, यंदा वातावरणातील बदलामुळे उत्पादनात घट होण्याची शक्याता आहे. त्यामुळे या रानमेव्यावर अवलंबून असलेल्या हजारो आदिवासी कुटुंबांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच दिवसेंदिवस झाडे कमी होत असल्यामुळे भविष्यात या रानमेव्यावर अवलंबून असलेले उत्पन्नाचा स्रोत धोक्यात येण्याची शक्यता आहे.





### बाजारात मोठी मागणी

**चारोळीला स्थानिक तसेच बाहेरील बाजारात मोठी मागणी आहे. त्यामुळे व्यापारी थेट आदिवासींकडून खरेदी करुन तीची पुढे पुरवठा साखळी तयार करतात. चारोळी वेचणीच्या हंगामावर आमच्या घराचा खर्च चालतो. या उत्पन्नामुळे उन्हाळ्यात थोडा आधार मिळतो. पण, यंदा उत्पादन कमी असल्यामुळे चिंता वाढली आहे.**

**–मनोज वसावे, स्थानिक भगदरी**

# एकल महिलांच्या सक्षमी करणासाठी निवेदन सादर




दैनिक वादळ वार्ता

**बीड | प्रतिनिधी**

एकल महिलांच्या विविध समस्या तसेच त्यांच्या सक्षमीकरणाच्या मागण्यांसंदर्भात साऊ एकल महिला समितीच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी आदरणीय शिवकुमार स्वामी यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे एकल महिलांना भेडसावणाऱ्या आर्थिक, सामाजिक व प्रशासकीय अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी राज्य निमंत्रक हेरंब दादा कुलकर्णी यांच्या उपस्थितीत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी एकल महिलांच्या हक्कांसाठी विविध मागण्या मांडल्या. शासनाच्या विविध योजनांचा लाभ सहज मिळावा, तसेच महिलांना स्वावलंबी बनवण्यासाठी विशेष उपक्रम राबवावेत, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.या प्रसंगी साऊ एकल महिला समितीचे बीड जिल्हा समन्वयक बाजीराव ढाकणे, गेवराई तालुका समन्वयक ॲड. सुभाष निकम, आष्टी तालुका समन्वयक सुरेश मामा गांजुरे, दिपक भुजबळ, माजलगाव तालुका समन्वयक जीवन राठोड, तसेच बीड तालुक्यातील कार्यकर्ते किशोर कुलकर्णी आणि दत्ता गायकवाड आदी उपस्थित होते.निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी सादर करण्यात आलेल्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

# केजमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त पाणी व नाश्ता वाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

### जे पी डव्हरटाईजमेंट अँड मार्केटिंग बिझनेसचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त जे पी डव्हरटाईजमेंट अँड मार्केटिंग बिझनेस चे प्रमुख प्रशांत हजारे यांच्या वतीने पिण्याच्या पाण्याची व गोड नाश्त्याची उत्कृष्ट सोय करण्यात आली होती.या उपक्रमाचे हे ८ वे वर्ष असून,दरवर्षीप्रमाणे यंदाही कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला केज शहरातील तसेच बीड जिल्ह्यातील विविध राजकीय क्षेत्रातील मान्यवर नेत्यांनी उपस्थित राहून भेट दिली व उपक्रमाचे कौतुक केले.सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमात मोठ्या संख्येने भीम सैनिक, उपासक व उपासिका सहभागी झाले होते. उपस्थितांनी पिण्याच्या पाण्याचा व नाश्त्याचा लाभ घेत आनंद व्यक्त केला.समाजोपयोगी उपक्रमांमुळे जयंती उत्सवाला सामाजिक स्वरूप प्राप्त झाले असून,अशा उपक्रमांचे सर्वत्र स्वागत होत आहे.



# एन जे ऑनिमल रेस्क्यू टीमकडून पक्षी व प्राणी बचावाचे उल्लेखनीय कार्य

दैनिक वादळ वार्ता

**छ.संभाजीनगर | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर–दि.१७ एप्रिल : शहरामध्ये व परिसरामध्ये बऱ्याच वर्षांपासून एन जे ऑनिमल रेस्क्यू टीम ही संस्था जखमी पक्षी व प्राण्यांच्या बचावासाठी सातत्याने कार्यरत आहे. कुठेही जखमी किंवा अडचणीत सापडलेले प्राणी आढळताच, ही टीम तात्काळ घटनास्थळी पोहोचते.या संस्थेमध्ये एन जे ऑनिमल रेस्क्यू टीममध्ये श्री.नितेश जाधव, श्री.आंनद वाघमारे,श्री.दत्ता बारोरकर, श्री.प्रकाश कोकळे या सर्वांच्या सहकार्याने व योगदानाने त्या प्राण्यावर त्वरित उपचार करून त्यांना पुन्हा सुरक्षितपणे नैसर्गिक वातावरणात सोडण्यात येते. या टीमच्या सेवेमुळे अनेक निरपराध जीवांचे प्राण वाचत असून, निसर्ग संवर्धनासाठीही या टीमच्या वतीने मोलाचे योगदान दिले जात आहे.




# प्रमाणित लेखा परीक्षक सी.ए.खोडसे यांच्या कार्यालयास मा.आ.साठे यांची सदिच्छा भेट

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज शहरातील सुप्रसिद्ध प्रमाणित लेखा परीक्षक तथा सहकार क्षेत्रातील प्रशिक्षक श्री.चत्रभुज खोडसे यांच्या केज येथील संपर्क कार्यालयाला माजी आमदार श्री.पृथ्वीराज साठे यांनी दि.१८ एप्रिल रोजी शनिवारी सदिच्छा भेट दिली.यावेळी माजी आमदार श्री.पृथ्वीराज साठे यांचा शाल,पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.यावेळी विवीध विषयावर मनमोकळी चर्चा करण्यात आली. यावेळी प्रमाणित लेखा परीक्षक श्री.चत्रभुज खोडसे यांच्यासह अंबाजोगाई नगर पालिकेचे माजी नगरसेवक श्री.अशोक मोदी,पत्रकार चंद्रकांत पाटील,अभिषेक पाटोळे आदी मान्यवर उपस्थित होते.माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी चत्रभुज खोडसे यांच्या कार्याचा गौरव करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# भगवान परशुराम जन्मोत्सवा निमित्त आयोजित रक्तदान शिबीर संपन्न; शिबीराला महिलांचा उदंड प्रतिसाद

दैनिक वादळ वार्ता

**केज | प्रतिनिधी**

केज शहरातील बालाजी मंदिर येथे भगवान परशुराम जन्मोत्सवा निमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या रक्तदान शिबीरामध्ये पुरुष बांधवासह महिला वर्गानी सक्रिय सहभाग घेऊन रक्तदान केले आहे. बीड येथील जिल्हा शासकीय रुग्णालय यांनी रक्त संकलन केले तसेच रक्तदात्यांना कार्ड वाटप केले.जिल्हा रुग्णालय रक्तपेढी बीड येथील डॉ. संजना मडम,श्री. रामनाथ खेडकर, श्री.संतोष गायकवाड, श्री.सतीश गायकवाड यांनी रक्त संकलन करून रक्तदान करणाऱ्या सर्व बंधु भगिनी यांचे आभार व्यक्त केले.रक्तदान हे जीवनदान असुन आपल्या रक्तदानामुळे रुग्णांना जीवदान मिळु शकते.त्यामुळे रक्तदान करावे असे आवाहन चतुर्वेद प्रतिष्ठानच्या पदाधिकारी यांनी केले. यावेळी समाज बांधव व महिला भगिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिति होती.आभार प्रदर्शनाने शिबीराची सांगता झाली.



# बोबडेवाडीच्या शंकर करपे महाराजावर केज अंनिसची कार्यवाही!

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज गेली कांही वर्षांपासून लोकांना वेगवेगळया आजारावर इलाज करतो, लहान मुले व महिलावर उपचार करून त्यांच्या समस्या सोडवतो असे सांगून सामान्य लोकांना गंडविण्याचे काम करत होता. यापूर्वी चार महिन्यापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बीड जिल्ह्यातील अशा तक्रार प्राप्त भोंदू लोकांची नावासह यादी जाहीर करून कार्यवाहीचा इशारा दिला होता. त्यानंतर बऱ्याच ठिकाणच्या अशा भोंदू महाराज बाबांनी लोकांना फसवण्याचे धंदे बंद केले होते. मात्र जिल्ह्यातील कांही ठिकाणची भोंदूगिरी बंद झालेली नव्हती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला जिल्ह्यातून अशा भोंदू महाराजांची माहिती व तक्रारी भेटल्या आहेत. त्यानुसार १७ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले, केज शाखेचे कार्याध्यक्ष गौतम बचूटे आणि बुवाबाजी संघर्ष समितीचे सचिव हनुमंत सौदागर यांनी बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज याच्याकडे भेट देऊन जाब विचारला असता संबंधित भोंदू महाराजाने आपणांस





कांहीही येत नसल्याची कबुली दिली तसेच यापुढे आपण अशी भोंदूगिरी कधीही करणार नाही अशी कबुली ही दिली आहे. आपणांस कसलीही रिद्धी सिद्धी नसून लोकच स्वतः होऊन येऊन भाग पाडत होते. मात्र यापुढे भविष्यात आपण कोणतीही अशी कृती करणार नाही अशी कबुली दिली. समितीचे सदस्य भोंदू महाराजाच्या अर्धा तास समवेत असताना अमावस्याचे अवचित्य साधून अनेक लोक आपल्या समस्या घेवून या महाराजाकडे आलेले दिसले. यापूर्वी या भोंदू महाराजाकडे राज्यातील अनेक आमदार व इतर पदस्थ राजकीय पदस्थ केज व बीड जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी या महाराजाकडे समस्या घेवून भेटून गेल्याची माहिती मिळत आहे. केज शहरातील कांही प्रतिष्ठित लोकांनीही या महाराजाकडे आपल्या समस्या सोडवण्यासाठी हजेरी लावल्याची माहिती पुढे येत आहे. यावरून लोक किती कमजोर आत्मविश्वासाचे, स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास न ठेवता कर्मकांडावर विश्वास ठेवून बुद्धी गहाण ठेवणारे अविवेकी लोक आहेत याची कल्पना येते. या महाराजांबद्दल कांही तक्रारी वरून पुराव्यासह आणखी माहिती गोळा केली जात आहेत. ही माहिती महाराष्ट्र अंधश्रद्धा समितीच्या मुख्य कार्यालयाकडे पाठवली जाणार असून कायद्या अंतर्गत योग्य ती पोलीस कार्यवाही केली जाणार आहे. केज तालुक्यासह बीड जिल्ह्यातील सर्व अशा भोंदू महाराजावर कार्यवाही मोहीम महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बीड जिल्हा समिती व सर्व तालुका शाखानीं पोलिसांच्या मदतीने हाती घेतली आहे. या महाराजावर पुराव्यासह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन जादूटोणा विरोधी कायदया अंतर्गत गुन्हें दाखल केले जातील अशी माहितीही हनुमंत भोसले यांनी दिली आहे. धर्म व अध्यात्म विषयक श्रद्धा ही वेगळी बाब आहे मात्र याच्या आडून सामान्य व अशिक्षित ( दुर्दैवाने या अशिक्षितामध्ये अंधश्रद्धा व भोंदूगिरीचे समर्थन करणारे बहुतांश तथाकथित उच्च शिक्षितांचा तसेच उच्च पदस्थ आयएएस व आयपीएस सारख्या उच्च पदस्थ अधिकाऱ्यांचा समावेश आहे ) बीड जिल्ह्यातील समाजप्रेमी व शोषण विरोधी नागरिकांनी आपल्या परिसरातील अशा भोंदू महाराज बाबांची संपूर्ण माहिती, पुरावे आणि तक्रारीसह माहिती ९४२३७३३८८८ या व्हाट्सअप क्रमांका वर पाठवावी आणि महिला व समाजाचे शोषण करणाऱ्या विरोधातील या लढ्यात निर्भयपने सहभागी व्हावे असे आवाहनही बीड जिल्हा अंनिसच्या वतीने जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले, कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण, हनुमंत सौदागर व गौतम बचूटे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# ‘आई-बाप’हीच जगातील सर्वात मोठी तीर्थक्षेत्रे

## व्याख्याते वसंत हंकारे यांच्या विचारांनी मरखेलकर भारावले!

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील मरखेल येथे महात्मा बसवेश्वर जयंती व अखंड शिवनाम सप्ताहाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या व्याख्यानमालेत महाराष्ट्राचे प्रसिद्ध युवा व्याख्याते आणि समाज प्रबोधनकार मा. वसंत हंकारे सर यांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'आई-बाप समजावून घेताना' या विषयावर जिल्हा परिषद हायस्कूलच्या मैदानावर पार पडलेल्या या हृदयस्पर्शी व्याख्यानाने हजारो मरखेलकरांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या.या भव्य सोहळ्याचे उद्घाटक म्हणून सरपंच गवाले साहेब,यांनी उपस्थित राहून आपले प्रबोधनात्मक विचार मांडले. यावेळी त्यांनी तरुणाईने महापुरुषांचे विचार आचरणात आणून आई-वडिलांची सेवा करणे, हाच खरा धर्म असल्याचे सांगितले.



या कार्यक्रमाला बबन पाटील गोजगावकर, कैलास येजगे, संतोष पाटील, शिवराज पाटील माळेगावकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच प्रशासकीय स्तरावरून पोलीस निरीक्षक रवी हुंडेकर, पीएसआयपवार साहेब यांनीही उपस्थिती दर्शवली. गावातील प्रथम नागरिक सरपंच गवाले साहेब, संदीप पाटील, भरत पाटील, धुमाळे काका, लाखे सावकार, मच्छिन्द्र दादा गवाले, पपू रेड्डी, हांडे सर यांच्यासह पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, विविध संस्थांचे चेअरमन आणि अनेक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. मरखेल येथील तरुण युवा मित्रांनी या कार्यक्रमाचे अतिशय देखणे आणि शिस्तबद्ध नियोजन केले होते. या सोहळ्यासाठी गावातील महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांची उपस्थिती लक्षणीय होती. वसंत हंकारे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत कौटुंबिक मूल्ये आणि आई-वडिलांचे महत्त्व अधोरेखित केले, ज्याला श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. मशाल क्रांतीच्या या विचारांनी मरखेलमध्ये एक वेगळीच सामाजिक ऊर्जा निर्माण झाल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# पात्रुडच्या सरपंच सौ.नौशाद लतीफ मोमीन यांना आदर्श सरपंच पुरुस्कार जाहिर

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

गावाला शुद्ध पाणीपुरवठा गावांतर्गत पेवर ब्लॉक बसवणे गावांतर्गत सिमेंट रस्ते व सिमेंट नाली बांधकाम तसेच दिवाबत्ती यासारख्या सार्वजनिक व मूलभूत सोयीसुविधासह विविध घटकांना शासकीय योजनेचा वैयक्तिक लाभ देण्यात मौजे पात्रुड तालुका माजलगाव जिल्हा बीड ग्रामपंचायतने आघाडी घेतलेली असून बचत गटाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक दृष्ट्यासक्षम करण्यासाठी घरच्या घरी रोजगार देण्यासह विविध उपक्रमाने ग्रामपंचायतीने लक्ष वेधले आहे. खामगाव - पंढरपूर या रस्त्यावर मौजे पात्रुड तालुका माजलगाव जिल्हा बीड हे वीस हजार लोकसंख्येचे गाव आहे. माजलगाव पासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर असल्याने गाव आणि शहरात फारसे अंतर नाही पण विकास कामांमध्ये गेल्या दोन वर्षात एक वेगळी ओळख निर्माण करत गावाला खऱ्या अर्थाने विकासाच्या जवळ पोहोचवले आहे शुद्ध पाणी रस्ते पेवर ब्लॉक नाली व दिवाबत्ती यासारख्या सार्वजनिक सोयी सुविधा देण्यासह वैयक्तिक योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सौ.नौशादताईने अगदी कौशल्याने पुढाकार घेत कामे केली आहेत त्यातूनच आज गावातील उपेक्षित गरजूंना घरकुल वाटप केले तसेच



जागतिक महिला दिनाचे कार्यक्रम व बालविवाह मुक्त करण्यासाठी जनजागृती व गुणवंत विद्यार्थी यांचा पालकासमवेत सत्कार करणे तसेच बचत गटातील महिलांना रोजगारासाठी थेट अनुदान आणि कामगार कल्याण योजनेतून शेतमजुरांनाही आर्थिक सहाय्य यासारख्या विविध योजनांचा लाभ दिला त्याशिवाय गावच्या स्वच्छतेवर लक्ष केंद्रित करताना हागणदारीमुक्त ही केले आहे व उपसरपंच व सर्व ग्रामपंचायत सदस्यासह आम्ही हातात झाडू घेतला नको फ्लेक्स नको गुलाल आता गावच्या स्वच्छतेसाठी झाडू घेऊ हातात असा संदेश देऊन लोक सहभागातून गावच्या स्वच्छतेला प्राधान्य देणार असल्याचे कृतीतून आम्ही दाखवून दिले व दलित वस्तीला रस्ते व नाली व सौर पथदिवे अशी विकासाची कामे करीत असताना केवळ ग्रामपंचायत ग्रामनिधीतून गावची प्रगती होत नाही तर लोकसहभाग असल्याशिवाय विकासाचे पाऊल पुढे सरकणार नाही एक माणूस शंभर पावले चालणे म्हणजे विकास नसून शंभर माणसे एक पाऊल चालणे म्हणजे विकास होय हे आम्ही लोकांना पटवून दिले आपल्या या कामाने आज माजलगाव तालुक्यात नव्हे तर बीड जिल्ह्यातील विकासाच्या वाटेवर असलेल्या आघाडीच्या गावामध्ये मौजे पात्रुड चा समावेश अग्रक्रमाने होतो यावर्षीच मौजे पात्रुडला लोकमत समूह व बीकेटी टायर्स यांच्या वतीने लोकमत सरपंच अवॉर्ड २०२५ मध्ये वीज व्यवस्थापनासाठी पुरस्कार मिळालेला आहे. सरपंच सौ नौशाद यांच्या कामाची दखल घेऊन सरपंच परिषद मुंबई यांनी आदर्श सरपंच पुरुस्कार जाहिर केला आहे दिनांक ३० एप्रिल रोजी पुणे येथे महाराष्ट्र चे ग्राम विकास मंत्री ना. जयकुमार गोरे,विधान परिषद चे सभापती मा, राम शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे,महाराष्ट्र आदर्श सरपंच पुरुस्कार जाहिर झाल्या पात्रुडकरांनी शुभेच्छा दिल्या.

# लोणी येथे 10 MVA ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नाला मोठा दिलासा

दैनिक वादळ वार्ता
**आष्टी । प्रतिनिधी**

लोणी : विजेच्या अपुऱ्या व अनियमित पुरवठ्यामुळे अनेक वर्षांपासून अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी लोणी येथे आज महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला. माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते येथील वीज उपकेंद्रात10 MVA क्षमतेच्या अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण मोठ्या उत्साहात पार पडले.



या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे परिसरातील वीजपुरवठ्यावरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार असून, शेतकऱ्यांना नियमित, स्थिर व दर्जेदार वीजपुरवठा मिळण्यास मदत होणार आहे. यामुळे विशेषतः सिंचनासाठी लागणारी वीज वेळेवर उपलब्ध होऊन शेतीच्या कामांना गती मिळणार आहे.कार्यक्रमास राहुल भैय्या लोणीकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच शेतकरी, नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे स्वागत केले.यावेळी मार्गदर्शन करताना आ. बबनराव लोणीकर म्हणाले, शेतकऱ्यांचा वीज प्रश्न हा त्यांच्या उत्पादनक्षमतेशी आणि आर्थिक स्थैर्याशी थेट जोडलेला आहे. कमी दाब, वारंवार खंडित होणारी वीज आणि अनियमित पुरवठा यामुळे शेतीला मोठा फटका बसत होता. 10 MVA क्षमतेचा हा ट्रान्सफॉर्मर त्या समस्येवर दीर्घकालीन उपाय ठरेल. आता शेतकऱ्यांना अखंड आणि दर्जेदार वीज मिळेल.ते पुढे म्हणाले की, ग्रामीण भागातील वीज व्यवस्था अधिक सक्षम व सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, लोणी येथील हा प्रकल्प त्या दिशेने उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.कार्यक्रमास तहसीलदार जाधव, वीज वितरण विभागाचे अधिकारी, सरपंच गजानन लोणीकर, ग्रामपंचायत सदस्य तसेच स्थानिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या प्रकल्पाचे स्वागत करत, शेतकऱ्यांसाठी हा निर्णय अत्यंत लाभदायक ठरणार असल्याचे मत व्यक्त केले.नवीन ट्रान्सफॉर्मरमुळे लोणीसह परिसरातील गावांना अधिक स्थिर व पुरेसा वीजपुरवठा मिळणार असून, याचा थेट परिणाम शेती उत्पादनात वाढ, खर्चात बचत आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीवर होणार आहे.एकूणच, लोणी येथील 10 MVA ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण हे केवळ एक पायाभूत सुविधा प्रकल्प नसून, शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणारे आणि ग्रामीण विकासाला चालना देणारे निर्णायक पाऊल ठरत आहे.

# अजंदे-रावेर रोडवर कठडे नसलेल्या पुला मुळे आजुन कितीक तरुणांचा जीव जाणार?

दैनिक वादळ वार्ता
**जळगाव । जितु इंगळे**

रावेर ते अजंदे हा रस्ता सोयीस्कर आहे. - आहे. पण या रस्त्यावरील पोदार स्कूलजवळ असलेला कठडे नसलेला पूल वाहतुकीसाठी धोकादायक ठरतो अपघाताचा धोका टाळण्यासाठी हा पुल उंच करून कठडे बसवावे, अशी मागणी आहे. रावेर परिसरातून ऐनपूर तापी परिसराला जोडणारा रावेर ते अजंदे हा रस्ता महत्त्वाचा आहे. या रस्त्यावर रोज स्कूल बस, केळी वाहतूक करणाऱ्या वाहनासह अन्य अवजड वाहने धावतात. या रस्त्यावरील रावेर पोदार लर्न हायस्कूल जवळील हा रस्ता जीवघेणे ठरते आहे. या ठिकाणी स्कूलजवळ असलेले वळण असलेल्या पुलाला कठडे नाही. परिसरातील नागरिकांनी प्रशासनाकडे या पुलाला संरक्षक कठडे बसावे अशी मागणी - अनेकवेळा केली. पण उपयोग झालेला नाही. त्यामुळे या वळण रस्त्यावर व कठडे नसकेला हा पूल खूप धोकादायक ठरत आहे पुलावर वारंवार दुर्घटना घडतात. या ठिकाणी एका मंगळवारी रात्री अपघात झाला. त्यात अजंदे (ता. रावेर) गावातून मित्राच्या हळदीच्या कार्यक्रमाहून घरी



जाणाऱ्या पुनखेडा येथील २४ वर्षीय युवकाचा पुलावरून पडून जागीच मृत्यू झाला तर एक जण गंभीर जखमी झाला. मागील वर्षी याच ठिकाणी ट्रक उलटून दोन मजूर ठार व काही जखमी झाले होते व शाळेतील विद्यार्थ्यांची एक ऑटो रिक्षा ही उलटली होती. त्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी बांधकाम विभागाने पुलाची उंची वाढवून पुलाला संरक्षक कठडे बसावे, अशी मागणी होते आहे.

# प्रहारचे जिल्हाधिकारी यांना अन्य मागण्यासाठी निवेदन,त्वरीत कारवाईची मागणी;संबधीत कर्मचारी यांच्यावर प्रहारचा हल्लाबोल

दैनिक वादळ वार्ता
**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

किल्ले धारूर तालुक्यातील दिव्यांग बांधव,शेतकरी बांधव,वाहन चालक,यांच्या प्रमुख मागणीसाठी निवेदन प्रहारच्या वतीने तहसिल कार्यालयामार्फत जिल्हाधिकारी यांना पाठविण्यात आले.

अधिक माहिती अशी कि,निवेदन मधील काही प्रमुख मागण्या :-

१) धारूर तालुक्यातील प्रत्येक दिव्यांग बांधवाला स्वतःचा रोज़गार सुरू करण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर २०० चौ.फूट जागा उपलब्ध करून तात्काळ देण्यात यावी.

२) वडवणी ते थेटेगव्हाण हा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत असून तो तात्काळ दुरुस्त करावा.

३) पंचायत समिती तसेच संबंधित ग्रामपंचायतींच्या माध्यमातून दिव्यांगांसाठी राखीव असलेला ५ टक्के निधी कोणताही विलंब न लावता थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात यावा.

४) नगर परिषद किल्ले धारूर अंतर्गत बांधण्यात आलेले व्यावसायिक गाळे दिव्यांगांना देताना त्यांचा लिलाव न करता 'लकी ड्रॉ' (सोडत) पद्धतीने वाटप करावे.

५) दिव्यांग बांधवांचा कायद्या २०१६ अँटोसिटी अॅक्ट बीड जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस ठाण्यात बोर्ड फलक लावण्यात यावे.हे सर्व मुद्दे शेतकरी, दिव्यांग बांधवाच्या,वाहन चालक,या सर्वांच्या सन्मानाने जगण्याच्या हक्काशी संबंधित आहेत.तरी तातडीने जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांना त्वरित कार्यवाहीचे आदेश द्यावेत.संबधित कर्मचारी सदरील तात्काळ कार्यवाही करत नसतील तर त्याच्यांवर हि निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हा सरचिटणीस तथा ता.अध्यक्ष हनुमंत तोंडे,उपाध्यक्ष विष्णू चोले,शहराध्यक्ष बापू सिरसठ,सचिव अशोक ईगोंले, महिला ता.अध्यक्षा सुमित्रा धस,स्मिता चव्हाण,हातागळे,पांचाळ,युवा उपाध्यक्ष उतरेश्वर चव्हाण,प्रहार सेवक परमेश्वर हडिंबाग,वाघमारे,आदी प्रहार सैनिकांनी प्रसिद्धि पत्रकाद्वारे, निवेदनाद्वारे केली आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077